दिनांक 15/04/2023

**प्रेसनोट**

**उपविभागिय पोलीस अधिकारी यवतमाळ यांचे पथकांकडुन पो.स्टे. यवतमाळ शहर हद्दीतील मोटारसायकल चोरी करणारा विधीसंघर्ष बालक यास ताब्यात घेउन यवतमाळ शहर हद्दीतील चोरीचा गुन्हा उघडकीस**

दि.14/04/2023 रोजी पो.स्टे.यवतमाळ शहर हद्दीतील आसाम टी सेंन्टर समोरुन टांगा चौक यवतमाळ येथुन बुलेट 350cc दुचाकी वाहन चोरी गेल्याचे समजले वरुन घडलेल्या गंभीर मोटारसायकल चोरी च्या घटनासंबधाने चोरीचा तपासाच्या अनुषंगाने गुन्हा उघडकीस येण्याकरीता चोरीच्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता उप.वि.पो.अ.श्री.संपतराव भोसले यांनी आपले कार्यालयातील अधिनस्त SDPO पथकातील सपोनि/संजय राठोड व त्यांचे पथक यांना गुन्हा उघडकीस आणणेकरीता गुन्ह्या बाबत मार्गदर्शन केले त्यावरुन SDPO पथकातील पोलीस हवालदार अन्सार बेग यांनी आपले गोपनिय बातमीदाराकडुन चोरीच्या गुन्ह्याबाबत माहीती प्राप्त करुन गुन्ह्यात अथक परीश्रम घेउन गुन्ह्याचा कसोशीने प्रयत्न करुन सदर गुन्ह्यातील चोरीचे वाहन अप्सरा टॉकीजच्या मागे गोदाम फैल येथे एका विधीसंघर्ष बालकाने चोरुन स्वतः जवळ बाळगुन असल्याचे खात्रीलायक बातमी वरुन पोलीस हवालदार अन्सार बेग व पथक यांचे सह जाउन सदर विधीसंघर्ष बालकास त्याचे राहते घरी वडीलांसमक्ष ताब्यात घेउन त्याचे घरातील बुलेट वाहनाबाबत विश्वासात घेउन विचारपुस केली असता त्याने सदरचे दुचाकी वाहन टांगा चौक यवतमाळ येथुन चोरी केल्याचे कबुल केले.

पो.स्टे.यवतमाळ शहर हद्दीतील चोरी गेलेला गुन्ह्यातील मुद्देमाल 1 बुलेट वाहन कि.अं.90,000/-रु चा मुद्देमाल विधीसंघर्ष बालक याचे कडुन जप्त करण्यात आले असुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास यवतमाळ शहर पोलीस करीत आहे.

सदरची कारवाई मा.श्री.पवन बन्सोड, पोलीस अधिक्षक साहेब,यवतमाळ. मा.श्री.पियुष जगताप साहेब अपर पोलीस अधिक्षक यवतमाळ, मा.श्री.संपतराव भोसले उपविभागीय पोलीस अधिकारी यवतमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि/ संजय राठोड, पोहवा/ अन्सार बेग, प्रशांत झोड, प्रविण उईके, विकास कमनर, सलमान शेख यांनी पार पाडली आहे.

**(श्री.संपतराव भोसले)**
**उप.वि.पो.अधि.उपविभाग यवतमाळ**